


(वर्ष ९५) आश्विन ते मार्गशीर्ष - शके १९४४ - ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ (संयुक्तांक १ ते ३)

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ७ |
| ३) | सद्गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | ११ |
| ४) | अमृतकण | १६ |
| ५) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | १९ |
| ६) | निवेदन | २२ |
| ७) | विशेष सूचना | २४ |
| ८) | सद्भक्तांचे आभार | २५ |
| ९) | शताब्दी वर्षातील काही निवडक कार्यक्रम | २६ |

Regd. No. 9023/57

**बुक पोस्ट**

प्रति,

SADBHAKTI PRAKASH

द्वारा
**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**
श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०.

**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ६०.फोन : २८२४५२७२

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३. | १५ फेब्रुवारी २०२३ मंगळवार | सा. ५.३० वा. | प.पू. सद्गुरु श्री निरंजन स्वामी ह्यांच्या चरित्रावर सखोल भाष्य | | श्रीक्षेत्र नरसोबा वाडीचे महंत प.पू. श्री विवेकबुवा गोखले |
| २४. | १६ फेब्रुवारी २०२३ गुरुवार | सा. ५.३० वा. | प.पू. सद्गुरु श्री नारायण महाराज ह्यांच्या चरित्रावर सखोल भाष्य | | |
| २५. | १७ फेब्रुवारी २०२३ शुक्रवार | सा. ५.३० वा. | प.पू. सद्गुरु श्री टाकी महाराज ह्यांच्या चरित्रावर आणि अद्भुत पुण्यस्थान सद्भक्ती मंदिर ह्यावर सखोल भाष्य | | |
| २६. | १८ फेब्रुवारी २०२३ शनिवार | सा. ५.३० वा. | प्रवचन - श्री रामेश्वराची, अर्थात श्री मांगिरीश कुलदैवताची कृपादृष्टी | | |

**टीप** : वरील कार्यक्रम निश्चित केलेले आहेत. अजून बरेचसे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. कलाकारांशी बोलणी झालेली आहेत. फक्त, त्यांच्या तारखा निश्चित व्हायच्या आहेत. तसे झाल्यास फेसबुक आणि वेबसाईटद्वारे कळविण्यात येईल.

वरील सर्व कार्यक्रम सद्भक्ती मंदिरात होणार आहेत. फक्त शनिवार दि. १८ फेब्रुवारी २०२३ म्हणजे महाशिवरात्रीच्या दिवशी प.पू. श्री विवेकबुवा गोखले ह्यांचे श्री शिवमाहात्म्य ह्या विषयावर होणारे प्रवचन **श्री रामेश्वर मंदिरात होईल** सायंकाळी ५.३० वाजता.

कुठलीही पूर्वसूचना न देता कार्यक्रमात काही बदल करणे अपरिहार्य असले तर तसे करण्याचे संपूर्ण अधिकार सद्भक्ती प्रसारक मंडळींच्या विश्वस्त मंडळाला आहेत.



**।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।**



**- संपादकाचे बोल -**

**(वर्ष ९४) आषाढ ते भाद्रपद (शके १९४४) (जुलै ते सप्टेंबर)**

**(संयुक्तांक १० ते १२)**

**आषाढ, श्रावण, भाद्रपद (जुलै ते सप्टेंबर)**

**महिन्यातील कार्यक्रमांचा गोषवारा**

## (आषाढ मास)

रविवार दि. १०.७.२०२२ला देवशयनी आषाढी एकादशी होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

बुधवार दि. १३.७.२०२२ (आषाढी पौर्णिमा) गुरुपौर्णिमा होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली. ११.३० वाजता गुरुपादुकांस एकादशणी करण्यात

आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा। सगुण रूप धरिले ओजा।। (३) गुरु माझा, मी गुरुचा।दास त्यांचा बहुजन्मीचा।। (४) नाचत गुरुभजनी। आम्ही जाऊ निरंजनी।। (५) गुरुचे भजन, हेचि माझे ध्यान। तोचि पूर्ण ज्ञान जाण माझे।। (६) मी बाळू तूं जननी सद्गुरुमाते।। (७) माझा सद्गुरु ब्रम्हानंद। (८) अधिर नयन झाले हे पाहाया । रुप गुरुराया दिव्य तुझे।। (९) टाकियला निजभार रामा (१०) आणि शेवटी भवतारक ह्या तुझ्या पादुका वंदीन मी माथा। करावी कृपा गुरुनाथा।। ही प्रार्थना म्हणण्यात आली. ह्यानंतर सर्व सद्भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळाला. सायंकाळी ५.३० वाजता परमार्थ दिपिका वाचन झाले व इतर पदे म्हणण्यात आली.

गुरुवार दि. १४.७.२०२२ रोजी (आषाढ वद्य प्रतिपदा). सायंकाळी ५.३० वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण झाले.

शुक्रवार दि. १५.७.२०२२ (आषाढ वद्य द्वितीया) रोजी परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाई जयंती होती. प्रात: स्मरणाचे नंतर स्तवन व प्रार्थना करण्यात आली. १० वाजता जन्मोत्सव संपन्न झाला. त्यापूर्वी (१) अधिर नयन झाले हे पहाया। रुप गुरुराय दिव्य तुझे।। त्यानंतर (२) बाळा जो जो रे कुलभूषणा। रामचंद्र वंदना (३) विश्व डोलारा माजि आत्मा हरि।। पाळणा म्हणण्यात आला. त्यानंतर (४)देई मला इतुके गुरुराया ही प्रार्थना म्हणण्यात आली. ११.३० वाजता गुरुपादुकास एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा। सगुण रूप धरिले ओजा।। (३) संत चरण तीर्थी करीन आंबोळी। ऐसे वनमाळी करी मज। (४) तुजहुनि कोणी नसे मज थोर गुरुजी। (५) अनंत जन्मीचे पुण्य फळा आले। पाय हे ल—– सद्गुरुचे ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन झाले. त्यावेळी सुद्धा भावपूर्ण पदे म्हणण्यात आली. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव संपन्न झाला.

रविवार दि. १७.७.२०२२ (आषाढ वद्य तृतीया) सायंकाळी ५.३० वाजता नामसंकीर्तन झाले.



सोमवार दि. १८.८.२०२२ (आषाढ वद्य पंचमी) आद्य सद्गुरु श्री नारायण महाराजांची पुण्यतिथी होती व जयंतीपण होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली. ११.३० वाजता एकादशणी झाली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा। सगुण रूप धरिले ओजा। (३) संत चरण तीर्थी करीन आंबोळी। ऐसे वनमाळी करी मज।। (४) नारायण नाम सार जपत जा सदा रे (५) हर हर हे काय नरा। कशी तव मती गेली (६) बोला नारायणा बोला। वंदा गुरुमाऊलीला (७) कोण्या काळी येशिल दिनबंधु। दत्तदेवा सद्गुरु दयासिंधु (८) आद्य गुरु श्री नारायण आज भेटला।। (९) अवतरिसि उत्क्रमिसी। आषाढ वद्य पंचमीसी (१०) आणि शेवटी यारे यारे सद्गुरुच्या घरी जाऊ ही प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण झाले व सर्व सद्भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळाला. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन झाले.

मंगळवार दि. १९.७.२०२२ (आषाढ वद्यषष्टी)ला सायंकाळी ५.३० वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण झाले.

मंगळवार दि. २६.७.२०२२ (आषाढ वद्य ययोदशी) रोजी श्री नामदेव महाराज पुण्यतिथी होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली.

बुधवार दि. २७.७.२०२२ ((आषाढ वद्य चतुर्दशी) रोजी श्री सावतामाळी पुण्यतिथी होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

## (श्रावण मास)

### ऑगस्ट :

सोमवार दि. १.८.२०२२ रोजी इंग्रजी तारखेनुसार गुरुवर्य श्री भाईंचा जयंती दिन होता.

सोमवार दि. ८.८.२०२२ (श्रावण शुद्ध एकादशी - पुत्रदा एकादशी) रोजी गुरुवर्य श्री भाईंची जयंती होती. ११.३० वाजता एकादशणी केली गेली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा। सगुण रुप धरिले ओजा।। (३) हसत मुख पाहू या डोळा। आजि श्री रामचंद्र भोळा।। (४)

अनंत जन्मीचे पुण्य फळा आले। पाय हे लाघले सद्गुरुचे (५) जन्मला नि टाकी कुळी श्री गुरुवरा। टाकी म्हणते त्यागीअर्थ शोभतो खरा।। (६) आणि शेवटी सनाथ करावे अनाथाच्या नाथा। ठेवियला माथा चरणावरी।। ही प्रार्थना म्हणण्यात आली. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन झाले. त्यावेळी (१) रामा तूं येई मम हृदयी वास करी (२) येरे येरे त्वरे माझ्या रामा (३) प्रगट होई, प्रगट होई आजि रामचंद्रमा। दावी श्री मुखप्रभा चकोर बालकां अम्हा।। सायंकाळी ७.४७ वाजता जन्मोत्सव साजरा झाला. त्यावेळी (१) बाळा जो जो रे कुलभूषणा। श्री शंकर नंदना।। (२) विश्व डोलारामाजि आत्मा हरि। हा पाळणा म्हणण्यात आला. (३) आजिचा दिवस सोनियाचा वाटे। रामचंद्र भेटे बालरूपे।। (४) छत्र सिंहासनी सद्गुरु देखिला। ध्यानस्थ बैसला रामचंद्र।। (५) एकादशी श्रावण शुद्धमासी। हे साधिली तव कृपे बखी अम्हांसि।। (६) आस इतुकी उरली की। मिठी मारीन सद्गुरुसि।। (७) मधुर मधुर बहु मुरली तुझी रे हरि।। (८) जन्मलति टाकी कुळी श्री गुरुवरा। टाकी म्हणजे त्यागी अर्थ शोभतो खरा।। ह्या पदाबरोबर दिवसाची सांगता झाली.

गुरुवार दि. ११.८.२०२२नारळी पौर्णिमा होती. सकाळी १० वाजता श्रावणी व होमहवन झाले.

शनिवार दि. १३.८.२०२२ (श्रावण वद्य प्रतिपदा) रोजी श्री सिद्धारुढ स्वामी पुण्यतिथी होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन झाले.

संत श्री ज्ञानेश महाराज जयंती होती व परमपूज्य बाबांच्या रौप्य पादुका स्थापन दिन होता.

गुरुवार दि. १८.८.२०२२ (श्रावण वद्य ——-) श्रीकृष्ण जयंती व श्री लक्ष्मण महाराज इंदूर पुण्यतिथी होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना झाली. रात्रौ १०.३० वाजता श्री रमा व —दासांची पदे म्हणण्यात आली. १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव संपन्न झाला. त्यावेळी (१) बाळा जो जो रे कुलभूषणा। वसुदेव नंदना।। (२) विश्व डोलारा माजि आत्मा हरि।। (३) तेरो ध्यान गोपाला निसदिन ——–। ह्या पदाने समाप्ती झाली.



शुक्रवार दि. १९.८.२०२२ (श्रावण वद्य अष्टमी) रोजी गोपाळकाला व सद्भक्ति मंदिराचा शंभरावा वर्धापन दिन होता. यंदा हा दिवस विशेष उत्साहात साजरा झाला. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता एकादशणी झाली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा। सगुण रूप धरिले ओजा।। (३) प्रेम मंदिर वाढदिवस। आणि करू बरा (४) —– कासया त्यजुनि कृष्ण चरणा (५) म्यां शंकर पूजिला भावे. पूजिला... (६) श्लोक - प्रथम वंदुनि श्री हरि श्रीपती। नमू विधि सरसिज देवा प्रति।। अभिचरणां स्वशिरी धरू। अधन आश्रय नरांसचि स्मरू।। साळी - नारायण द्वय - राधाकृष्ण हाती धरूनि हाता। शंकरसुत श्री रामचंद्र प्रभू चरणी ठेवू माथा।। वामन पंडित - रामदास - श्री तुकाराम - श्री नाथा। काया वाचा मन सेवुनि नमन करू या संता।। (७) श्लोक - श्री रामचंद्र प्रभू शंकराला आत्मजाला। प्रेमे प्रणाम करू टाकी कुल आत्मजाला।। (८) सद्भक्ति मंदिर उभारूनि मंडळी ते। स्थापूनिया करू प्रसाराची कार्य येथे।। श्री दत्त पंचकचि कृपा फळास आली। सद्भक्ति मंदिर इमारत सिद्ध झाली।। श्री वायने करवुनि सुप्रवेश नामे। सात्त्विक बहू जेथ उद्धरिके श्रीरामे।। (९) श्री रामचंद्र चरणा—- गुंग व्हावे। भृंगे मने अनुदिनी अति शुद्ध भावे।। ——— श्रवण कीर्तन घडावे। श्री विष्णुच्या हृदयी नित्य सुखे रहावे।। (१०) मधुर मधुर बहु भुलली रे तुझी रे।। (११) हेंचि करी रे अनंता। क्षण जाऊ नेदि रिता।। (१२) ——–– चिन्मय चरणीं मागू हेंचि दान। सदय कल्पद्रुम जनी प्रभू सम न आन।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. त्यानंतर वर्धापन दिनानिमित्त महाप्रसादाचा लाभ मिळाला.

## (भाद्रपद मास)

बुधवार दि. ३१.८.२०२२ (भाद्रपद शुद्ध चतुर्थी) श्री गणेश चतुर्थी होती. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना केली गेली.

मंगळवार दि. ६.९.२०२२ (भाद्रपद शुद्ध एकादशी) रोजी श्री निरंजन व रघुनाथ स्वामी पुण्यतिथी होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली.

रविवार ११.९.२०२२ (भाद्रपद वद्य प्रतिपदा) सद्गुरु श्री दादाभाई महालय दिन होता. प्रातः स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना करण्यात झाली. ११.३० वाजता एकादशणी झाली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) गुरुचे भजन हेचि माझे ध्यान। तेंचि पूर्ण ज्ञान जाण माझे।। (४) अर्पियला निज प्राण देवा। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

बुधवार दि. २१.९.२०२२ (भाद्रपद वद्य एकादशी) रोजी श्री बलभीम महाराज पुण्यतिथी दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली.

सोमवार दि. २६.९.२०२२ (आश्विन शुद्ध प्रतिपदा) या दिवशी घटस्थापना होती. शारदीय नवरात्रांस प्रारंभ झाला. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. सायंकाळी ५.३० वाजता श्री दुर्गास्तोत्र, नवरात्र उपासना व कलौचंडी विनायको वाचन करण्यात आले.

**: इति :**



**।। श्री सद्गुरुभ्योनमः ।।**

# श्री गुरुवर्य श्री भाईंचे प्रवचन

**२३.११.१९३०**

**।। श्री गणेशाची आरती ।।**

**"जय देव, जय देव, ॐकारा गणराया, जय सद्गुरुराया।**
**आरती ओवाळूं तुज विघ्नें हराया।।धृ.।।......"**

गणेशाची योग्यता जाणून ज्ञानी लोक त्याची पूजा शुक्त पक्षांतील चतुर्थीला करितात. तिला विनायकी चतुर्थी असे म्हणतात. "**विनायक**" म्हणजे विश्वाचा नायक, वैकुंठ नायक, त्याची कृपा व्हावी म्हणून समंजस लोक त्याला खाली दिलेल्या अभंगांत सांगितल्याप्रमाणे भजतात :-

**"चतुर्थतुर्येंत पूजितां। तुजशीं। चंद्रमन त्यासी नये पाहूं।।"**

चतुर्थीला चंद्राला का पाहू नये ह्याचा आपण आता विचार करू. चतुर्थी म्हणजे तूर्यावस्था. ह्या अवस्थेंत इंद्रियांचे व्यापार होत नाहीत. इंद्रियांचा स्वामी मन आहे व मनाचा स्वामी चंद्र आहे. म्हणून ह्या अवस्थेत जर चंद्राकडे पाहिले तर मन वृत्तीवर येईल. आणि इंद्रियांचे व्यापार सुरू होतील. कारण मन वृत्तांवर आले की देहात्मता स्फुरुं लागते आणि साधकाचे स्वरूपानुसंधान राहत नाही म्हणून श्रृति सांगते की साधकांनी देहावर येऊच नये. याचा अर्थ असा की साधकाने अहर्निशी स्वरूपानंदच

भोगावा. तो इतका भोगावा की :- **"पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा यावत्यतति भूतले। उत्थायच पुन्ः पीत्वा पुनर्जन्म न विद्यते।।"** ह्या स्थितीला व्यतिरेक योग ही संज्ञा आहे. परंतु ह्या योगाने **"आवरण"** व **"विक्षेप"** जाणार नाहीत. त्यासाठी अन्वय ज्ञानाची आवश्यकता आहे. दोर न जाणणें हे आवरण आणि त्याच्यावर सर्पाचा आरोप करून त्यापासून भीति उत्पन्न होणे हा विक्षेप, तंतू न जाणणे हे आवरण व त्यावर पटाचा आरोप करणे हा विक्षेप होय. व्यतिरेक योगाच्या अभ्यासाने वृत्ती देहावर येणार नाही व त्या योगेकरून जन्ममरण चुकू शकते. जोपर्यंत हा योगी समाधि स्थितीत असतो तोपर्यंत त्याला स्वात्मसुक मिळते. परंतु उत्थानकाळी त्याला जड जग यथा पूर्व दिसेल. ह्या स्वात्मसुखाचे वर्णन श्रुति, स्मृति, पुराण व संत यांनी केले आहे ते असे :-

श्रुति :- **"यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह। आनंद ब्राह्मणो विद्वान्न विभेति कदाचन।।"**

स्मृति :- **"सुखामात्यंतिक यत्तदुद्धिग्राह्य मतीं द्रियम्।।"** (भ.गी. ६-२१)

पुराण :- **"मामेकमेव शरण मात्मानं सर्व देहिनाम्। याहि सर्वात्म भावेन मयास्था त्द्य कुतोभयम्।।"**

संत :- **"प्राणेंद्रियादि सकळांस हि जो कळेना। वआचेस आणिक मनासहि आकळेना।। शुद्धें मनें अनुभवाप्रतिये तथापि। तेव्हा पतंग मन होय चिदात्मदीपीं।।"** (पु.दी. २६८)

व्यतिरेक ज्ञान प्राप्त झाल्यावर जी स्थिती प्राप्त होते तिचे येथे पर्यंत वर्णन झाले. आता अन्वयज्ञान झाल्यावर जी स्थिती प्राप्त होते. तिचे वर्णन श्रुति, स्मृति, पुराण व संत यांनी केले आहे ते असे :-

श्रुति :- **"यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति। आत्मानं सर्व भूतेषु न ततो निजुगुप्स्यते।।"** (पु.दी. ५२९)

स्मृति :- **"सर्व भूतस्थ मात्मानं सर्व भूतानि चात्मनि। ईक्षत्ते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः।।"** (भ.गी. ६-२९)

पुराण :- **"सर्व भूते। यः पश्येत् भगवद्धावमात्मना। भूतानि भगवत्यात्मन्येव भागवतोत्तमः।।"** (पु.दी. ५५२)



संत :- **"ज्ञानाचे फळ ते हे की देखे आत्मा चराचरीं।।" तेव्हा तो सिद्ध बोलिजे।।**

जरी साधक अशारीतीने ज्ञान संपन्न झाला तरी तो तेवढ्याने कृतकृत्य होत नाही. कारण सद्गुरुपासून अन्वय व्यतिरेक ज्ञान संपादन करून जर तो ते बाणण्यासाठी अभ्यास करणार नाही, तर ते ज्ञान होऊन न होऊन सारखेच होण्याचा संभव आहे. ते बाणण्याकरितां वामन पंडितांनी एक सोपा उपाय सांगितला आहे :- **"गुरुपासूनि घ्यावे ज्ञान। मग ईश्वर म्हणून त्याचे भजन। त्या भजने बाणतसे समाधान। जें उपदेशिलें ते ज्ञानचि बिंबतें श्रुति म्हणें।।"**

सनत्कुमारासारख्या वैराग्यशील योग्यांच्या बोकांडी विक्षेप बसला तर आमची गोष्ट सोडून द्या. त्यांना विक्षेपाच्या तावडीतून सोडविण्यासाठी भगवंतानेही स्वतः हंसरूपाने येऊन उपदेश केला की :-

**"तात्काळ जावया देहाभिमान। अखंड माझें नामस्मरण।**
**गीत नृत्य हरिकीर्तन। सर्वांभूतीं समान मद्भावो।।"**

अशा सतत दृढ अभ्यासानें मी जो सर्वगत परमेश्वर त्या माझ्या ठायीं चित्त स्थिर होईल :-

**"मद्भावे भूतें समस्त। सर्वदां पाहतां सतत।**
**मी तू रीय जो सर्वगत। ते ठायीं चित्त प्रवेशे।।"**

हा उपाय नाथांनी सांगितला आहे. विक्षेप व आवरण जाणण्याला वामन पंडित व तुकाराम महाराज ही असाच उपाय सांगतात :-

**"अधिष्ठान सिद्धासनीं क्षिप्रसिद्धी। जगद्रूप मी सर्व ऐसी प्रसिद्धी।।**
**शरीरें फिरावें उठावें बसावें। परी नित्य योगासनीं त्या असावें।।"**

ह्याचाच स्पष्टार्थ तुकाराम महाराजांनी केला आहे तो असा :-

**"जाणोनि नेणते करी माझें मन। तुझी प्रेम खूण देवोनियां।।"**

ह्या प्रेमकलेवरच साधक जीव धरून असतो. चालत असतां,बोलत असतां तो ब्रह्मसुखाचा अनुभव घेतो. तो समाधी लावून काळोखाच्या खोलीत जड मूढ अशा स्थितींत पडून रहात नाही. तर प्रपंचांतील संपूर्ण कामे करून पद्य पत्रासारखा अलिप्त रहातो.

**"मग मी व्यवहारीं असेन वर्तत। जेंवी जळाआंत पद्मपत्र।।"**

व्यवहारांत बायको त्याला आपला नवरा समजतो. मुलगा त्याला बाप मानतो. मित्र त्याच्याशी सख्यत्वाने वागतात. पण कोणी त्याच्याशी शत्रूच्या भावनेनें वर्तन ठेवितात. कोणी त्याची स्तुति करितात व कोणी निंदा करितात. परंतु ही व्यवहारांतली नातीं त्याच्या गावी ही नसतात व निंदा स्तुतीचा त्याच्यावर काहीच परिणाम होत नाही.

**"ऐकोनि नायके निंदा स्तुति कातीं। जैसा का उन्मनी योगीराज।।"**

ह्या योग्याला निंदा व स्तुति ह्या दोहींचा ही अर्थ बरोबर समजतो. पण ती ऐकूनही त्यांचा विकार तो आपल्या मनावर होऊ देत नाही.

**"देखोनि न देखे प्रपंच हा दृष्टीं। स्वप्नीचीया सृष्टि चेविल्या जेंवी।।"**

जसे आपण स्वप्नामधील व्यवहार जागृतींत पाहतो, तसे प्रपंचातील व्यवहार खोटे, मृगजळवत् केवळ भासरूप आहेत. त्यांना कवडीची ही किंमत नाही ह्या दृष्टीने तो लेखतो.

**"तुका म्हणे ऐसें झालिया वाचून। करणे तें तें शीण वाटतसे।।"**

अशी स्थिती साधकाने करून घेतली पाहिजे आणि अशी अन्वय समाधि साधली पाहिजे. दुसऱ्या एका अभंगांत तुकाराम महाराजांनी ईश्वराची अन्वय योग बाणण्यासाठी प्रार्थना केली आहे.

**"एकांतीचे सुख देईं मज देवा। आघात या जीवा चुकवूनी।।**
**ध्यानीं रूप वाचे नाम निरंतर। आपुला विसर पडो नेदीं।।**
**माय बाळा भेटी सुखाची आवड। तैशी मज गोडी देईं देवा।।"**

देवा! देहाभिमानाचे व त्यापासून होणाऱ्या कामक्रोधाच्या विकारांचे आघात चुकवून, ज्याप्रमाणें ज्ञानी व अज्ञानी संपूर्ण सुवर्णालंकारांचा अंत एका सुवर्णांतच पाहतात, त्याप्रमाणें ह्या जड जगाचा अंत एका चैतन्य स्वरूपांत होतो हे पाहण्याची दृष्टि म्हणजे अखंड अन्वय समाधिसुख मला दे. हे प्राप्त होण्याला एकच उपाय आहे. तो हा कीं भगवंताचें नाम अखंड गाणें :-

**"देहीची चालक कला गमेल। सर्वरूपी समरंगी रमेल।**
**चित्सुख परात्पर निजधान। श्री राम जय राम जय जय राम।।"**

**: नारायण :**



**।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।**

# श्री सद्‌गुरु श्री दादाभाईंचे प्रवचन

**शनिवार : १.५.४३**
**संध्याकाळी : ५.३० ते ६.३०**

श्री वामन पंडित म्हणतात की श्री तुकाराम महाराजांच्या बरोबर तुलना करण्यास सर्व जगतात एकही संत नाही. पहा ते शास्त्री, विद्वान ब्राह्मण असून श्री तुकाराम महाराजांची स्तुति केली. त्यावरून ते अगदी निस्पृह होते हे सिद्ध होते आणि म्हणूनच त्यांचे चरणवंदन करण्यास आम्ही भोगावी त्यांच्या उत्सवाला जात आहोत. असो. श्री वामन पंडिताची ही स्तुति फार मोठी आहे तेव्हा लोकमान्य टिळक सांगतात त्याप्रमाणे त्याचा आरंभ मध्य व शेवट वाचू.

**जसे भक्तीचे वाचूनी**
**जिवननौका बुडाली.**

तनू म्हणजे लिंगदेह तो ब्रह्मरूप होऊन ब्रह्मस्वरूपांत लीन झाला व मग तो भगवद्रूप केला. श्री तुकाराम महाराज ही चतुर्भुज झालेली मूर्ती घेऊनच वैकुंठाला

गेले व आपली ही द्विभूज मूर्ती सत्वसामर्थ्याने पंचमहाभूतांना देऊन टाकली.

**परंधाम टाकूनि कैसा उडाला? जीवनमुक्त होऊनि ब्रह्मीं बुडाला।**

**जयाची तनू ब्रह्मरुपी बुडाली भवभ्रांती हे जाण कैसी गळाली।।३।।**

**जयादर्शनें स्पर्शनें मुक्त होती तुकाराम वाचेंसि जे आणिताती।**

**पुनर्जन्म त्या प्राणिया लागि कैंचा तुकाराम वाणी जया नाम वाचा।।२।।**

काय हे श्री तुकाराम महाराजांवर प्रेम. ते म्हणतात की विठोबा विठोबा म्हणू नका त्याऐवजी तुकाराम तुकाराम म्हणा त्यायोगें लवकर फलप्राप्ती होईल. असे जो नित्य करीत तो प्रती तुकारामच होईल. कारण भगवानच सांगतात :-

**यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम्।।**

**तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावित:।।** (भ.गी.)

नेहमी दिनयामिनी तुकाराम महाराजांचे ध्यान करणारा प्रती तुकाराम झालाच पाहिजे.

**पुनर्जन्म त्या प्राणिया लागिं कैंचा, तुकाराम वाणी, जया नाम वाचा।।**

श्री वामन पंडित छातीवर हात ठेवून म्हणतात की ज्याच्या वाणींत नेहमी तुकाराम हे नाम आहे त्याला पुनर्जन्म नाही.

श्रीभाई हे पंढरपूरला गेल्यावेळीं प्रथम विठोबाच्या देवळाकडे जाण्याऐवजी चुकून महाराजांकडे गेले पण तेथे लोक सांगू लागले येथे अशी वहिवाट आहे की प्रथम पांडुरंगाचे दर्शन घेऊन मग येथे यावयाचे. पण श्रीभाई म्हणाले ते दोघे भिन्न कोठे आहेत.

**गाईन मी आता तुकया तुकया।**

श्री तुकाराम महाराज भृंगी कीटक न्यायाने विठ्ठलरूपच झाले तेव्हा विठोबा व ते भिन्न नाहीत असो. अशा श्री तुकाराम महाराजांना फक्त श्री वामन पंडितांनी ओळखले. ते त्यांना शरण गेले पण महाराजांनी त्यांना समर्थांकडे पाठविले. समर्थांनी सांगितले मलयचलावर जाऊन तपश्चर्या करा. मग तुम्हाला हे ज्ञान प्राप्त होईल त्याप्रमाणे त्यांनी तपश्चर्या करताच आचार्य मठांतील सच्चिदानंदयतीने प्रगट होऊन



त्यास बोध दिला. म्हणून ते म्हणतात :-

**सच्चित्सुखमय जनीं असें परी ते यतिराज मठोमठीं कैचे।।** असो.

आज सोमेश्वराच्या दर्शनास जावयाचे आहे. तेव्हा त्याचे स्तवन करावे असे वाटले तोच ते हृदयांत प्रगट झाले व त्यांनीच हे स्तवन केले. जेथे वेद न कळे नकळे म्हणून परतले तेथे आम्ही त्याचे काय स्तवन करणार? ध्रुव बालकाला स्तवन करावे असे वाटले पण भगवंताचे ते तेज:पुंज रूप पाहून तो गांगरून गेला. भगवंताने त्याचे मनोगत जाणून आपला शंख त्याच्या गालाला लावला तेव्हा त्याने जी स्तुति केली. त्यापुढे वेदस्तुतींनी माना खाली घातल्या. तेव्हा ज्याचे स्तवन त्यानेच करून घेतले पाहिजे. त्याप्रमाणे सोमेश्वरांनी हृदयांत प्रगट होऊन पुढील स्तवन करून घेतले ते प्रत्यक्ष येथे हजर आहेत म्हणून त्यांच्यासमोर ह्या पदावर निरुपण करू व मग नुसते त्यांचे दर्शन घेऊ. ते एकदेशीरूप आहे, पण येथे व्यापकरूप आहे.

**सोमेश्वरदेवा आलों दर्शनासी। आणि सुखराशी प्रेममूर्ती।।१।।**

देवा, तुझ्या दर्शनाला आलो आहे. तू सुखाची राशी आहेस. तुझे चरण धरल्यावर सुखाला काय कमतरता? तुझ्या चरणाचा स्पर्श होताच आम्ही सुखसागरात लीन होऊ.

**मागों तरी देवा हेंचि एक दान। लागों तुझें ध्यान निरंतर।।२।।**

तू वाटेल ते देण्यास समर्थ आहेस. कर्तुं अकर्तुं अन्यथा कर्तुं अशी तुझी शक्ति आहे व तूं कल्पवृक्षस्वभाव आहेस.

**जाणेल जो कल्पवृक्षपणें। आणि मागेल त्यासी काय उणे।**

**भक्तश्रेष्ठ या गुणें। की जाणोनि त्याचीच भक्ति मागती त्या पासी।।**

म्हणून तुझ्याकडे एकच मागतो. शिव साक्षात्कार झाल्यामुळे तुझ्या निर्गुणस्वरुपाची ओळख झाली आहे. त्या तुझ्या रूपात प्रारब्ध भोग सोडून बाकी सर्व काळ हे चित्त लीन व्हावे.

**शिवचि होऊनि तुजसी भजावें। स्वामी सेवकभावें अखंडित।।३।।**

(शिवो भुत्वां शिवं यजेत्।।) शिव होऊन तुझी सेवा करावी. पण स्वामी

सेवकभाव तू मंगेशस्वामी व आम्ही तुझी बालकें हा भाव कायम राहावा. तुला मिठी मारली आहे त्यातून सुटून तुझी भक्ति करावी व तुझ्या चरणाकडे हे मन लावावे.

**पीत्वा पीत्वा पुनः पीत्वा यावद्भुमीतले पतेत।**

**उत्थायच पुनः पीत्वा पुनर्जन्म न विद्यते।।**

वृत्ती ही स्वरूपात काढून तुझ्या चरणी लीन व्हावी. श्री नामदेव हेच मागतात:-

**मी पणा सहीत आनंदी बुडाले। न निघे काही केले चित्त माझे।।**

**मन उन्मन झाले, ते चैतन्यरुप झाले पण एकच वासना आहे।।**

**नामा म्हणे एक उरली वासना। स्वामी सेवकपणा देई देई।।**

तू स्वामी व मी सेवक ही भावना कायम ठेव श्रीभाई वरील पदांत हेच म्हणतात.

शिवपण नको तुझी सेवा अखंडित व्हावी.

**चैतन्यसागरी चित्त भागीरथी। मेळवी श्रीपती कूलस्वामी।।४।।**

आमचे कूळस्वामी मंगेश व तेच सोमेश्वर म्हणून त्याकडे मागू की चैतन्यरूपा सागरांत ही मनरुपी गंगा मिळवून टाक.

**गंगासागरी मीनली मिळे मीनली त्याचीच त्यावरी लोळे।**

**तैसा भक्त मिळोनी भाव बळे।**

**माझे भक्तीचे सोहळेमज माजी भोगी।।**

(ए.भा.)

गंगा-सागर-संगम भक्तीचा सोहळा भोगी व श्रीभाईंनी आम्हांला तुझ्यास्वआधीन केले आहे तेव्हा एवढे कर.

तुझे ध्यान केल्याने तुझ्या कृपेने व गुरुकृपेने ज्ञान होऊन ते बाणेल व मग तद्रूप होऊन पुन्हा स्वामी सेवक भाव कायम ठेवू व मग तुझ्या गंगा-सागर-संगम भक्तीचा सोहळा भोगू. पण हे मिळण्यास शंकर जे करतो ते केले पाहिजे. तो निरंतर रामाचे नामस्मरण करतो. राम त्याचा गुरु fortunately व आमचा व त्याचा गुरु एकच



तेव्हा तेच श्रीभाईंचे - श्रीरामाचे नाम घेऊन त्याच्या दर्शनाला जाऊ.

**श्रीराम जय राम जय जय राम।।** ———————— तारक नाम.

पण हे सत्संगतीतच साधेल म्हमून श्री वामन पंडित प्रार्थना करतात :-

**करीं वामन प्रार्थना श्रीमुकुंदा। तुझ्या भक्ता पायाचीया धुलीवृंदा।।**

**हरी घाली माझें शिरी सर्वकाळी। वाहातोसी अंगेचिया पायधुळी।।**

ज्या धुळींत भगवंता तूं निरंतर स्नान करतोस ते चरणरज आमच्या मस्तकावर घालून आम्हाला तद्रूप कर.

◈◈◈

## परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) संतांच्या काव्यांना चाली कशा स्फुरतात ते संत श्री ज्ञानेश्वर महाराजांची 'मनाचिये गुंतीं गुंफियेला शेला' ही ओवीं चालनिर्मितीच्या संदर्भात तंतोतंत समर्पक आहे. श्री तुकाराम, श्री ज्ञानोबा माऊली आदि संतांच्या काव्यांना मात्र चाल लावण्याचा प्रश्नच कधी निर्माण होत नाही. कारण चाल ही त्यांच्या काव्यातच दडलेली असते. शब्दांच्या आविष्कार क्षमतेला मर्यादा असतात पण भावनिक आविष्कार अमर्यादित असतात.

२) जीवन कसे असावे याचा आदर्श रामायणाने घालून दिला आहे. तर महाभारतात जीवन कसे आहे याचा मागोवा घेण्यात आला आहे. श्रीकृष्णाच्या जीवनाचा वेध घेणे म्हणजे सागरातील सुईचा शोध घेण्यासारखे आहे.

३) राम-कृष्ण ही दैवते आता ध्यानविषय झाली आहेत. मननांतून आणि उपासनेतून त्यांना प्राप्त होणारे रूप प्रतिकात्मक आहे. आता हे भक्तिभावाचे विषय झाले आहेत. ऐतिहासिक दृष्टीने काटेकोर अभ्यासांचा विषय म्हणून त्यांच्याकडे पहाणे म्हणजे लोकमानसाचे व्यापार कसे चालतात हे जाणून घेण्यास आपण असमर्थ आहोत अशी कबुली देणे होय.

४) अलौकिकांविषयी हुरहूर लावण्याचे सामर्थ्य उत्सवातील कार्यक्रमांत निश्चितच असले पाहिजे. कार्यक्रमांचे सामर्थ्य या अलौकिक सुंदर अनुभव देणाऱ्या क्षणांना पकडून स्थिर अमर करून ठेवण्यात आहे. कार्यक्रमात होणाऱ्या वाङ्मयसेवा श्रोतृवृंदाच्या काळजाला जाऊन भिडल्या पाहिजेत.

५) उत्स्फूर्तपणे झालेल्या वैचारिक रचनेने अमरत्व दिलेल्या अशा क्षणांचे पुन: पुन्हा दर्शन घडावे त्या अनुभवाच्या मोहाने चाहत्यांनी



जास्तीत जास्त वेळ त्या समागमाचा फायदा घेण्यात घालविला पाहिजे.

६) आपले वैयक्तिक व सामुदायिक जीवन यशस्वी करायचे असले तर मनुष्याने समाजातील परमार्थपर प्रवृत्तींची ज्योत सदैव तेवत ठेवलीच पाहिजे.

७) महत्त्वाचा मुद्दा असा पाहिजे की आपल्या बरोबर समाज मोठा होण्यात नेतृत्वाला मनापासून आनंद वाटला पाहिजे.

८) सगळी माणसे भक्तिभावानेनं प्रेरित होऊन आलेली नसतात. अनेकांचे अनेक हेतू असतात. अखिल मानवसृष्टि ही त्रिगुणात्मक आहे हे विसरता कामा नये.

९) भगवंताच्या गोष्टी आपल्या कानावर नेहमीच येत असतात. स्वार्थत्याग करून लोकजीवनाकरिता जीवन संपविणारा भगत विरळाच.

१०) मीलन नि वियोग यांचं भरती-ओहोटीशी किती जवळकीचं नात आहे. प्रीतीचा उदय नि प्रीतीचा विलय यातील अनुबंध या दोहोतही अगदी सारखाच नाही का? किनाऱ्याच्या भेटीसाठी आसुसलेला सार भरतीच्या लाटालाटांतून प्रगट होत असतो. तर किनारा अनुत्सुक असलेला हिरमुसला सागर त्यांच्या लाटेलाटेनं मागं मागं जाताना ओहोटीच्या रूपानं पुन: पुन्हा किनाऱ्याके वळून वळून पहात असतो.

११) अस्तामुळेच उदयाचा खराखुरा अर्थ आपल्याला कळतो. अस्त नसता तर उदयाचं रंगरूप न्याहाळताच आलं नसतं आणि ते तेवढं मोहकही वाटलं नसतं. उदय आहे म्हणून अस्त आहे असे म्हणण्याऐवजी अस्त आहे म्हणूनच उदय आहे असं म्हणणं अधिक पटतं.

१२) पैशाची उब असली तरी विचारांचा गारवा व विवकाची शीतलता ही साठवलेली शिदोरी म्हातारपण सुसह्य करते.

◈◈◈



प.पू. पंत बाळेकुंद्री महाराज



।। श्री सद्गुरु प्रसन्न।।

## ऑक्टोबर ते डिसेंबर (आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष) महिन्यातील उत्सव व महोत्सव

**आश्विन मास :**

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. २६.९.२०२२ (आश्विन प्रतिपदा) | घटस्थापना : श्री सरस्वतीचा फोटो ठेवणे. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. प्रतिपदा ते नवमीपर्यंत सायंकाळी ५ वाजता 'कलौ चंडी विनायकौ' व नवरात्र उपासना वाचन. |
| बुधवार | दि. ५.१०.२०२२ (आश्विन शुद्ध दशमी - विजया दशमी दसरा) | सद्भक्ति प्रसारक मंडळीचा वर्धापन दिन. या दिवसापासून मंदिराच्या शताब्दी महोत्सवास प्रारंभ होईल. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व सायंकाळी ६ वाजता पालखी मिरवणूक. ही पालखी मिरवणूक दोन्ही सोसायट्यांमधून फिरते. |
| रविवार | दि. ९.१०.२०२२ | कोजागिरी पौर्णिमा. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ७ वाजता रासलिलाभिनय. श्री कृष्णभक्तिपर पदे. |

### गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथ्योत्सव

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. १२.१०.२०२२ (आश्विन वद्य तृतीया) | गुरुवर्य श्री बाळेकुंद्री महाराजांचा पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना ११.३० वाजता एकादशणी ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. सायंकाळी ५ वाजता चरित्रवाचन. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| गुरुवार | दि. १३.१०.२०२२ (आश्विन वद्य चतुर्थी) | सायंकाळी ६ वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १४.१०.२०२२ (आश्विन वद्य पंचमी) | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| शनिवार | दि. २२.१०.२०२२ (आश्विन वद्य द्वादशी) | गुरुद्वादशी सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व महाप्रसाद. रात्रौ ९ वाजता पललखी मिरवणूक. |
| सोमवार | दि. २४.१०.२०२२ (आश्विन वद्य चतुर्दशी) | नरकचतुर्दशी प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता श्री रामेश्वर मंदिरात 'उद्धव-गोपी' गीत व सामुहिक भजनाचा कार्यक्रम. |

**कार्तिक मास :**

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. २६.१०.२०२२ (कार्तिक प्रतिपदा) | बलि प्रतिपदा प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता गुरुवर्य भाईंच्या सुखासनानिमित्त झालेले सद्‌गुरु दादाभाईंचे प्रवचन वाचन.११.३० वाजता एकादशणी. |
| शुक्रवार | दि. ४.११.२०२२ (कार्तिक शुद्ध एकादशणी) | प्रबोधिनी एकादशी सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५ वाजता 'पंढरीचा प्रसादमेवा' या प्रवचनाचे वाचन. |
| सोमवार | दि. ७.११.२०२२ (वैकुंठ चतुर्दशी) | कार्तिक शुद्ध चतुर्दशी व त्रिपुरारी पौर्णिमा. (कार्तिक पौर्णिमा) गुरुवर्य श्री भाईंचा अस्थि विसर्जन दिन. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता श्री भाईंच्या वैकुंठारोहणा विषयी झालेल्या सद्‌गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. रात्रौ ८ वाजता कमळे वाहणे. |
| बुधवार | दि. १६.११.२०२२ (कार्तिक वद्य अष्टमी) | श्री काळभैरव अष्टमी. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २२.११.२०२२ (कार्तिक वद्य त्रयोदशी) | श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथी दिन. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. |



**मार्गशीर्ष मास :**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. २.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) | श्री निरंजन स्वामी पादुका स्थापना दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| शनिवार | दि. ३.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी - मोक्षदा एकादशी) | श्री गीता जयंती व श्री माणिक प्रभू पुण्यतिथी दिन. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता श्री भगवद्‌गीतेचे सामूहिक पठन. |
| बुधवार | दि. ७.१२.२०२२ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) | श्री दत्तजयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व त्यानंतर महाप्रसाद. श्री दत्तजन्मोत्सव सायंकाळी ६ वाजता. पाळणा व इतर पदे. रात्रौ ९ वाजता पालखी मिरवणूक. |
| गुरुवार | दि. ८.१२.२०२२ | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |
| बुधवार | दि. १४.१२.२०२२ (मार्गशीर्ष वद्य षष्ठी) | श्री मोरया गोसावी पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. १८.१२.२०२२ (मार्गशीर्ष वद्य दशमी) | श्री रंगनाथ स्वामी पुण्यतिथी दिन. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. २५.१२.२०२२ (ख्रिसमस - नाताळ) | श्री येशू ख्रिस्त जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

✦✦✦

# : देणगीदारांसाठी निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| **Name of the Account** | **:** | **SADBHAKTI PRASARAK MANDALI** |
| **Bank Name** | **:** | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | **:** | 00610010000130 |
| **IFSC Code No.** | **:** | NKGS0000006 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| | | **OR** |
| **Bank Name** | **:** | Bank Of India |
| **Account No** | **:** | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | **:** | BKID0000164 |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.



**Mr. Vivek Tamhane**
Tamhane & Mehta (Chartered Accountants)
1, Gauresh Apartment, Ground Floor, Old Police Lane,
Near Andheri Court, Andheri (East), Mumbai : 400 069.
**Tel No. : 022-2683 2838**

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

| | | |
|---|---|---|
| **१. श्री. विवेक ताम्हाणे** | **भ्रमणध्वनी :** | ९८२०३५०८६७ |
| **२. श्री. नागानंद निळेश्वर** | **भ्रमणध्वनी :** | ९८२१२७०७७२ |
| **३. श्री. अरूण विजयकर** | **भ्रमणध्वनी :** | ९२२३२२२२४५ |

✦✦✦

# विशेष सूचना

सर्व भक्तांना कळविण्यास आनंद होतोय की आपले संकेत स्थळ, अर्थात वेबसाईट, www.sadbhaktimandir.com आता पूर्णत: कार्यरत झाले आहे. श्री दत्तगुरुंची कृपा, श्री नारायण महाराज जालवणकरांची आज्ञावजा प्रेरणा आणि प.पु. सद्‌गुरु श्री टाकी महाराज ह्यांचे आशीर्वाद पाठीशी असल्यामुळेच हे शक्य झाले.

सद्भक्ती मंदिर, प.पू. श्री टाकी महाराज (तिन्ही पिढ्या), श्री दत्तगुरु परंपरा, संत साहित्य, संत चरित्र, काही निवडक पदांचे श्राव्य प्रसारण (ऑडिओ), काही फोटो, आगामी उत्सव किंवा कार्यक्रमांची माहिती आणि इतर आवश्यक बाबी, इत्यादी उपयुक्त माहिती ह्या संकेत स्थळावर दिली आहे.

सद्भक्ती प्रकाश हे आपले त्रैमासिक देखील ह्या संकेत स्थळावर उपलब्ध केले जाते. सदरहू त्रैमासिक देखील योग्य समयी अपलोड केले जाईल. जिज्ञासूंनी ह्या संकेत स्थळाला जरूर भेट द्यावी आणि आमच्याशी संपर्क साधावा. आपला अभिप्राय अपेक्षित आहे.

अजून एक आनंदाची गोष्ट म्हणजे Sadbhakti Mandir हे आपले Facebook सदर (पेज) सुद्धा कार्यरत झालेले आहे. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे Sadbhakti Mandir हा आपला You Tube चॅनेल देखील कार्यरत झाला आहे.

सर्व भक्तांना विनंती आहे की त्यांनी आपल्या व्हॉट्सअ‍ॅप आणि फेसबुक वरील आणि इतर मित्र परिवारात, ह्या आपल्या तिन्ही प्रसार स्थळांची माहिती देऊन सद्भक्ती मंदिर आणि सद्भक्तीपंथ ह्यांचा जास्तीत जास्त प्रसार होऊन आपल्या प.पु. सद्गुरुंचे विचार आणि त्यांची शिकवण सर्वत्र प्रसिद्ध होण्याकरिता हातभार लावून गुरुसेवेच्या ह्या संधीचा लाभ घ्यावा.

✦✦✦



# सद्भक्तांचे आभार

सद्भक्ती मंदिर ही वास्तू प.पु. श्रीभाईंनी इ.स. १९२३ साली बांधली. ह्या वर्षीच्या विजया दशमीच्या दिवशी, म्हणजे दि. ५ ऑक्टोबर २०२२ रोजी, सद्भक्ती मंदिर शंभराव्या वर्षात पदार्पण करेल. त्या निमित्ताने ह्या दिवसापासून पुढील वर्षभर, अर्थात इ.स. २०२३च्या विजया दशमीपर्यंत शताब्दी वर्ष साजरे करण्याची प्रेरणा श्रीगुरुंनी दिली आहे. त्या निमित्ताने वर्षभर विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम करण्याचे योजिले आहे. श्रीगुरुंचीच प्रेरणा असल्यामुळे शताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्यास त्यांचेच मार्गदर्शन लाभून सर्व कार्यक्रम यशस्वी होतील अशी खात्री आहे.

शताब्दी वर्ष साजरे करण्यासंबंधी विश्वस्त मंडळी नियोजन करीत आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमात गायन, वादन, नर्तन इत्यादी सादर करण्याकरिता देशभरातील नामवंत कलाकारांना पाचारण करण्याविषयी विचार विनिमय चालू आहे.

सद्भक्ती ग्रंथालय आणि वाचनालय सुरू करण्याचा मंडळींचा मनोदय आहे आणि त्या दिशेने पावले टाकायला सुरूवात झालेली आहे. धार्मिक कार्यक्रमात मुख्यत: महाराष्ट्रातील नावाजलेल्या कीर्तनकारांचे कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जातील. शताब्दी वर्षातील प्रायोजित कार्यक्रमांची ही एक ढोबळ रूपरेषा आहे.

प.पु. श्री भाईंचा संस्कृत भाषेकडे असलेला ओढा लक्षात घेऊन संस्कृत भाषेचा प्रसार होण्याकरिता संस्कृत प्रबोधिनी सद्भक्ती प्रसारक मंडळींतर्फे नियमितपणे आयोजित केल्या गेल्या आहेत.

सद्भक्ति मंदिर या वास्तूला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत म्हटल्यावर ह्या इमारतीत दुरुस्ती, डागडुजी करण्याची नितांत आवश्यकता होती. बांधकामाच्या संदर्भातील कामे, इलेक्ट्रिकल कामे, प्लाम्बिंग, रंगरंगोटी इत्यादी गोष्टी विचाराधीन आहेत आणि ही सर्व कामे करणे अत्यंत गरजेचे होते.

श्रीगुरुंच्या कृपेने ही सर्व कामे व्यवस्थित पार पडली आहेत. काही किरकोळ कामे फक्त शिल्लक आहेत.

**सद्भक्तांनी सढळ हाताने मदत केल्यामुळेच हे शक्य झाले. तेव्हा त्यांचे आभार मानणे हे आमचे कर्तव्यच आहे.**

**ओम श्रीगुरुदेवदत्त!**

## सद्भक्ती मंदिर शताब्दी वर्ष

### कालावधी ५ ऑक्टोबर २०२२ ते ऑक्टोबर २०२३
### शताब्दी वर्षातील काही कार्यक्रमांची रूपरेषा

| क्र. | दिनांक आणि वार | वेळ | कार्यक्रम | दिनविशेष | कलाकार/सहभाग |
|---|---|---|---|---|---|
| १. | ५ ऑक्टोबर २२ बुधवार | स. ११.३० वा. | श्री गणेशपूजन आणि एकादशणी | विजयादशमी | भक्त परिवार |
| २. | | स. १०.३० वा. | लघुरुद्र | | भक्त परिवार |
| ३. | ९ ऑक्टोबर २२ रविवार | स. ५.३० वा. | शहनाई वादन | | पं. मधुकर धुमाळ आणि श्री. ओंकार धुमाळ |
| ४. | | सा. ७.०० वा. | भजनसंध्या | | श्री. स्वप्नील रहाते, कु. पूनम धुमाळ आणि कु. रचना धुमाळ |
| ५. | | स. ११.३० वा. | एकादशणी व नंतर महाप्रसाद | | |
| ६. | १२ ऑक्टोबर २०२२ बुधवार | सा. ५.०० वा. | चरित्रवाचन | गुरुवर्य श्री भाई आणि श्री बाळेकुंद्री महाराजांचा पुण्यतिथी दिन | भक्त परिवार |
| ७. | | सा. ८.३० वा. | शेजोत्सव | | |
| ८. | २२ ऑक्टोबर २०२२ शनिवार | सा. ११.३० वा. | एकादशणी | गुरुद्वादशी | भक्त परिवार |
| | | रा. ९.०० वा. | पालखी मिरवणूक | | |
| ९. | २४ ऑक्टोबर २०२२ सोमवार | स. १०.०० वा. | श्री रामेश्वर मंदिरात उद्धव-गोपी व सामुहिक भजन | नरकचतुर्दशी | भक्त परिवार |
| १०. | २६ ऑक्टोबर २०२२ बुधवार | स. १०.०० वा. | गुरुवर्य श्री भाईंच्या सुखासनानिमित्त झालेले सद्गुरु श्री दादाभाईंचे प्रवचन | बली प्रतिपदा | भक्त परिवार |
| ११. | | स. ११.३० वा. | एकादशणी | | |
| १२. | ३० ऑक्टोबर २०२२ रविवार | सा. ५.३० वा. | बासुरीवादन | | पं. नित्यानंद हळदीपुर |
| १३. | ६ नोव्हेंबर २२ रविवार | सा. ५.३० वा. | शास्त्रीय संगीत | | पंडित महेंद्र टोके |
| १४. | ७ नोव्हेंबर २२ सोमवार | स. ११.३० वा. | एकादशणी | त्रिपुरारी पौर्णिमा गुरुवर्य श्री भाईंचा अस्थि विसर्जन दिन | भक्त परिवार |
| १५. | | रा. ८.०० वा. | कमल पुष्पांजली | | |
| १६. | २७ नोव्हेंबर २२ गुरुवार | सा. ५.३० वा. | शास्त्रीय संगीत | | सौ. रश्मी मंजूरे |
| १७. | २ डिसेंबर २२ शुक्रवार | स. ११.३० वा. | एकादशणी | श्री निरंजन स्वामी पादुका स्थापना दिन | भक्त परिवार |
| १८. | ३ डिसेंबर २२ शनिवार | स. १०.०० वा. | श्री भगवद्गीतेचे सामूहिक पठण | श्री गीता जयंती व श्री माणिक प्रभू पुण्यतिथी दिन | भक्त परिवार |
| १९. | | स. ११.३० वा. | एकादशणी | | |
| २०. | ७ डिसेंबर २२ शनिवार | सा. ६.०० वा. | श्री दत्त जन्मोत्सव पाळणा व इतर पदे | श्री दत्त जयंती | |
| २१. | | रा. ९.०० वा. | पालखी मिरवणूक | | |
| २२. | १४ फेब्रुवारी २०२३ मंगळवार | सा. ५.३० वा. | प.पू. सद्गुरु श्री रघुनाथ बडजी नाशिककर ह्यांचे जीवनचरित्र | | श्रीक्षेत्र नरसोबा वाडीचे महंत प.पू. श्री विवेकबुवा गोखले |